दैनिक भास्कर, नागपुर, बुधवार, 25 जनवरी 2017

# महाविद्यालय में पालक सभा



ब्यूरो । वर्धा . बोरगांव मेघे स्थित औषधिनिर्माणशास्त्र शिक्षण व संशोधन संस्था महाविद्यालय में पालक सभा का आयोजन किया गया। इस सभा में प्रमुख अतिथि के रूप में पालक प्रतिनिधि महेश राठी व सीमा कुलकर्णी उपस्थित थे। कार्यक्रम की अध्यक्ष स्थान पर महाविद्यालय के प्राचार्य डॉ. आर.ओ. गंजीवाले व डॉ. एन.सी. मानेकर उपस्थित थे।

कार्यक्रम की शुरुआत अतिथियों के हाथों पारंपरिक दीप प्रज्ज्वलन कर किया गया। कार्यक्रम की प्रस्तावना प्रा. एस.डी. गोधी ने रखी। इस अवसर पर पालक प्रतिनिधि महेश राठी व सीमा कुलकर्णी ने संस्था का शैक्षणिक दर्जा, अनुशासन व विद्यार्थियों के शौक्षणिक विकास पर विचार व्यक्त की। अध्यक्षीय भाषण से प्राचार्य आर.ओ. गंजीवाले ने कहा कि विद्यार्थियों के विकास के लिए लगने वाली सभी सुविधाएं देने महाविद्यालय कटिबद्ध है। विद्यार्थियों का विकास यही सच्चा केंद्रबिंदू समझकर महाविद्यालय कार्य करता है। साथ ही अभिभावकों द्वारा पूछे गए सवालों का समाधान किया गया।

कार्यक्रम में सभी अभिभावक चंदु घाटोले, बी.पी. कुलकर्णी, विजया ठाकुर, पी.आर. कहाले, डी.एस. बेहरे, निलीमा येलचटवार, अजय मोहोड, प्रकाश साहू, विजय मौर्य उपस्थित थे। कार्यक्रम का संचालन डॉ. सचिन दिघडे ने किया। आभार प्रदर्शन डॉ. एन.सी. मानेकर ने किया। कार्यक्रम में डॉ. राठी, डॉ. कुंदन पाटील, दहीकर, साधना गौतम व सभी शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित थे।

लोकमत बुधवार, दि. ८ फेब्रुवारी २०१७

# आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा

## विदर्भस्तरीय स्पर्धेत ३० स्पर्धकांचा सहभाग



विजेत्या स्पर्धकाला बक्षीस प्रदान करताना मान्यवर.

वर्धा : औषधीनिर्माण शास्त्र शिक्षण व संशोधन संस्था, बोरगाव(मेघे) येथे विदर्भस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा घेण्यात आली. नोटाबंदीचा निर्णय देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकट करणारा आहे, असा स्पर्धेचा विषय होता.

बक्षीस वितरण कार्यक्रमाला आमदार डॉ. पंकज भोयर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थाध्यक्ष डॉ. नितीन धांडे तर संस्था कार्यकारिणी सदस्य प्रा. विनय गोहाड, पंकज देशमुख, प्राचार्य डॉ. आर.ओ. गंजीवाले, डॉ. योगेश पर्तीगे, डॉ. संतोष मोहदरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आर.ओ. गंजीवाले यांनी केले.

नोटाबंदीमुळे देशाची आर्थिक स्थिती बळकट होईल. केंद्र शासनाच्या धोरणाबाबत मान्यवरांनी माहिती दिली. संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी राम मेघे यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. या स्पर्धेला विदर्भातील अमरावती व नागपूर विद्यापिठात संलग्न असलेल्या विविध महाविद्यालयातील ३० स्पर्धकांनी सहभाग घेतला. स्पर्धेत प्रथम पुरस्कार पवन शर्मा, फुलसिंग नाईक महाविद्यालय याने मिळविला. द्वितीय क्रमांक शासकीय ज्ञान-विज्ञान महाविद्यालयाच्या आशिष कांबळे याने मिळविला. गुरुनानक कॉलेज ऑफ फार्मसी नागपूर येथील चमुने सांघीक पुरस्कार मिळविला. यात आकाश उगले तर उपविजेता चमु गुरुनानक कॉलेज ऑफ फार्मची मोनिका खेर्डे, हिमांशु चौधरी ठरले.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. मनीषा पुराणिक यांनी तर आभार जी.एस. तेलतुंबडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता प्रा. एस. डी. गांधी, डॉ. सचिन दिघडे, डॉ. टेणपे, डॉ. कुंदन पाटील, साधना गौतम आदींनी सहकार्य केले. (स्थानिक प्रतिनिधी)

तरुण भारत
www.tarunbharat.net
बुधवार, ८ फेब्रुवारी २०१७



पुरस्कार स्वीकारताना पवन शर्मा, आशीष कांबळे व अन्य

# नोटबंदीवर विदर्भस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा

तभा वृत्तसेवा
वर्धा, ७ फेब्रुवारी

स्थानिक औषधीनिर्माण शास्त्र शिक्षण व संशोधन संस्था बोरगाव (मेघे) येथे विदर्भ यूथ वेलफेअर सोसायटी, अमरावतीद्वारा प्रा. राम मेघे स्मृती सोहळा व विदर्भस्तरीय आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. वादविवाद स्पर्धेचा विषय नोटबंदीचा निर्णय देशाच्या अर्थव्यवस्थेस बळकट करणारा आहे हा होता.

अध्यक्षस्थानी डॉ. नितीन धांडे होते. प्रमुख अतिथी म्हणून आ. पंकज भोयर, प्रा. विनय गोहाड, पंकज देशमुख, प्राचार्य डॉ. आर. ओ. गंजीवाले, डॉ. योगेश पतिंगे, डॉ. संतोष मोहदरे उपस्थित होते.

डॉ. पंकज भोयर यांनी नोटबंदीमुळे देशाची आर्थिक स्थिती बळकट होईल, असे सांगून या बाबतच्या केंद्र शासनाच्या धोरणाबाबत माहिती दिली.

डॉ. नितीन धांडे यांनी स्व. राम मेघे यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. वादविवाद स्पर्धेला विदर्भातील अमरावती व नागपूर विद्यापीठात संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयातील ३० चमूने भाग घेतला होता. विजेत्यांमध्ये प्रथम पुरस्कार पवन शर्मा, द्वितीय पुरस्कार आशीष कांबळे, तृतीय पुरस्कार गुरुनानक कॉलेज ऑफ फार्मसी (नागपूर) व सांघिक पुरस्कार विजेती चमू शासकीय ज्ञान-विज्ञान महाविद्यालय अमरावतीचे आशीष कांबळे व आकाश उगले यांना देण्यात आला. उपविजेत्याचा पुरस्कार गुरुनानक कॉलेज ऑफ फार्मसी, नागपूरची मोनिका खर्डे व हिमांशू चौधरी यांना मिळाला.

प्रास्ताविक डॉ. आर. ओ. गंजीवाले यांनी केले. संचालन डॉ. मनीषा पुराणिक यांनी तर आभार जी. एस. तेलतुंबडे यांनी मानले. यशस्वितेसाठी प्रा. एस. डी. गांधी, डॉ. सचिन दिघडे, डॉ. टेनपे, डॉ. कुंदन पाटील, साधना गौतम यांनी परिश्रम घेतले.

तरुण भारत
शुक्रवार, ३ मार्च २०१७

# औषधी निर्माणशास्त्र संस्थेत कार्यशाळा

तभा वृत्तसेवा
वर्धा, २ मार्च

राज्य महिला आयोग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व बोरगाव (मेघे) येथील औषधी निर्माणशास्त्र शिक्षण आणि संशोधन संस्थेत महिला आणि महिला अत्याचार प्रतिबंधक कायदा या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. मार्गदर्शक म्हणून यशवंत विधि महाविद्यालयातील डॉ. शिप्रा सिंघम, प्रभारी प्राचार्य डॉ. राजेंद्र गंजीवाले, डॉ. मनीषा पुराणिक, साधना गौतम उपस्थित होते. भारतीय संविधानातील तरतुदींवर आधारित अनेक कायदे तयार करण्यात आले. या कायद्यांची अंमलबजावणी झाल्यास महिला अत्याचाराला निश्चितपणे आळा बसू शकेल, असे प्रतिपादन डॉ. सिंघम यांनी केले. प्राचार्य डॉ. गंजीवाले यांनी महाराष्ट्रातील महिला अत्याचाराच्या विविध प्रकरणांची माहिती देऊन जागृतीची गरज व्यक्त केली. ■

लोकमत शुक्रवार, दि. २४ मार्च २०१७




# आयपर येथे पुरस्कार वितरण

वर्धा : स्थानिक औषधीनिर्माणशास्त्र शिक्षण व संशोधन संस्था बोरगाव (मे‌ु) महाविद्यालयात फेस्ट २०१७ उद्घाटन सोहळा पार पडला. उद्घाटन समारंभास अतिथी एमगिरीचे संचालक डॉ. प्रफुल्ल काळे, चंद्रपूरचे निवासी जिल्हाधि[illegible] वैभव नावडकर, महा. चे प्र-प्राचार्य डॉ. राजेंद्र गंजीवाले, फेस्ट २०१७ चे इंन्चार्ज डॉ. एन.सी. मानेकर, डॉ. सचिन दिघडे, विद्यार्थी प्रतिनिधी आशिष थेर व अक्षय राऊत उपस्थित होते. प्रास्ताविकातून प्राचार्य डॉ. गंजीवाले यांनी महा.ने केलेल्या शैक्षणिक व संशोधन कार्यावर प्रकाश टाकला. गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. एमफार्म अभ्यासक्रमाची विद्यार्थिनी मिनल चव्हाण हिचा नागपूर विद्यापीठात उन्हाळी २०१६ मध्ये मेरिट आल्याबद्दल सुवर्ण पदक देऊन सत्कार करण्यात आला. प्राविण्य प्राप्त विद्यार्थी राकेश कोकाटे, पूजा धमाडे, अमोल बिसेन व पायल खेकरे यांनाही सन्मानित करण्यात आले.

तरुण भारत सोमवार, २७ मार्च २०१७

# युवकांनी कौशल्याद्वारे विकास साधावा : नावडकर



मीनल चव्हाणचा सत्कार करताना वैभव नावडकर, एमगिरीचे डॉ. प्रफुल्ल काळे व अन्य मान्यवर

तभा वृत्तसेवा
वर्धा, २६ मार्च

युवकांना मार्गदर्शन मिळणे गरजेचे झाले आहे. युवकांनी अंगभूत कौशल्य आत्मसात करून विकास साधण्याचे आवाहन चंद्रपूरचे निवासी जिल्हाधिकारी वैभव नावडकर यांनी केले. आयपर २०१७ च्या बक्षीस वितरण समारंभात मार्गदर्शन करताना बोलत होते. स्थानिक औषधी निर्माणशास्त्र

## 'आयपर'मध्ये 'फेस्ट २०१७'चे बक्षीस वितरण

शिक्षण व संशोधन संस्था बोरगाव (मेघे) महाविद्यालयात फेस्ट २०१७ चे उद्घाटन नुकतेच करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून एमगिरीचे संचालक डॉ. प्रफुल्ल काळे, चंद्रपूरचे निवासी जिल्हाधिकारी वैभव नावडकर, प्रभारी प्राचार्य डॉ. राजेंद्र गंजीवाले, डॉ. एन. सी. मानेकर, डॉ. सचिन दिघडे, आशीष थेर व अक्षय राऊत उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलित करून करण्यात आली.

प्राचार्य डॉ. राजेंद्र गंजीवाले यांनी शैक्षणिक व संशोधन कार्यावर प्रकाश टाकला. डॉ. प्रफुल्ल काळे, वैभव नावडकर यांनी मार्गदर्शन केले. एम. फार्म. अभ्यासक्रमाची विद्यार्थिनी मिनल चव्हाण नागपूर विद्यापीठामध्ये उन्हाळी २०१६ च्या परीक्षेत मेरिट आल्याबद्दल तिचा सुवर्णपदक देऊन सत्कार करण्यात आला.

महाविद्यालयातील प्रावीण्यप्राप्त विद्यार्थी राकेश कोकाटे, पूजा धमाडे, अमोल बिसेन व पायल खेकरे यांना सन्मानित करण्यात आले. फेस्ट २०१७ मध्ये पोस्टर स्पर्धा, डान्स, ड्रामा, फॅशन शो, रांगोळी स्पर्धा व इतर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. संचालन प्रा. डॉ. मनीषा पुराणिक यांनी, तर आभार आशीष थेर यांनी मानले. ■

सकाळ
वर्धा, सोमवार
१० जुलै २०१७

### औषधीनिर्माणशास्त्र संस्था

वर्धा : बोरगाव (मेघे) येथील औषधीनिर्माणशास्त्र शिक्षण व संशोधन संस्था, या महाविद्यालयातील एनएसएस विभागातर्फे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्र-प्राचार्य डॉ. राजेंद्र गंजीवाले होते. निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष मुरलीधर बेलखोडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. श्री. बेलखोडे यांनी वृक्षलागवड व वृक्ष संवर्धन यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वृक्षलागवडीमुळे निसर्गाचा समतोल टिकून राहतो. वृक्षलागवड ही काळाची गरज आहे, असे मत डॉ. गंजीवाले यांनी व्यक्त केले. यावेळी वनौषधींचे वृक्ष रोपण करण्यात आले. संचालन नीलेश करंडे यांनी केले.



वर्धा : फार्मसी महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करताना प्राचार्य गंजीवाले

दैनिक भास्कर
नागपुर. शुक्रवार, 29 सितंबर 2017

# वैश्विक फार्मासिस्ट दिवस पर प्रश्नमंजूषा स्पर्धा

ब्यूरो | वर्धा.

औषधिनिर्माणशास्त्र शिक्षण व संशोधन संस्था (आयपर) बोरगांव (मेघे) महाविद्यालय में वैश्विक फार्मासिस्ट दिवस पर औषधि विज्ञान पर आधारित आंतर महाविद्यालयीन प्रश्नमंजूषा स्पर्धा का आयोजन किया गया। स्पर्धा में विदर्भ के नागपुर, अमरावती, बुटीबोरी व स्थानीय फार्मसी महाविद्यालय के टीम ने सहभाग लिया।

पुरस्कार वितरण समारोह में मुख्य अतिथि के तौर पर वर्धा के खाद्य व औषधि प्रशासन के सहायक आयुक्त शहनाज ताजी, महाविद्यालय के प्राचार्य डॉ.आर.ओ. गंजीवाले, डॉ.एन.सी. मानेकर व प्रा. एस.डी. गांधी मंच पर उपस्थित थे। मुख्य अतिथि शहनाज ताजी ने फार्मासिस्ट दिवस का महत्व बताया। आयोजित स्पर्धा में विजेता टीम नागपुर के गुरुनानक फार्मसी महाविद्यालय की तथा उपविजेता टीम आयपर महाविद्यालय की टीम ठहरी। उन्हें मुख्य अतिथियों के हाथों पुरस्कार व प्रशस्ति पत्र दिया गया। कार्यक्रम का संचालन शिवाणी ढोकणे ने तथा आभार डॉ कुंदन पाटील ने किए। कार्यक्रम की सफलता के लिए प्रा. मिलिंद भोयर, प्रा.आमीर खान, डा. कुंदन पाटील, प्रा. जयश्री हाडके आदि ने अथक प्रयास किए।

सकाळ
वर्धा, गुरुवार
५ ऑक्टोबर २०१७

# 'आयपर'मध्ये आंतरमहाविद्यालयीन प्रश्नमंजूषा स्पर्धा

**सकाळ वृत्तसेवा**

वर्धा, ता. ४ : बोरगाव येथे येथील औषधीनिर्माणशास्त्र शिक्षण व संशोधन संस्था (आयपर) येथे जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त औषधी विज्ञानावर आधारित आंतरमहाविद्यालयीन प्रश्नमंजूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

नागपूर येथील गुरुनानक फार्मसी महाविद्यालयाची चमू विजेती तर आयपर महाविद्यालयाची चमू उपविजेती ठरली. स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ पार पडला. यावेळी अन्न व औषध प्रशासनातील सहायक आयुक्त शहनाज ताजी, प्रभारी प्राचार्य डॉ. आर. ओ. गंजीवाले, डॉ. एन. सी. मानेकर, प्रा. एस. डी. गांधी प्रामुख्याने उपस्थित होते. सहायक आयुक्त ताजी यांनी फार्मासिस्ट दिनाचे महत्त्व विशद करून या क्षेत्राच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. डॉ. गंजीवाले यांनी महाविद्यालयाने केलेल्या सामाजिक, शैक्षणिक व संशोधन कार्यावर प्रकाश टाकला. फार्मासिस्ट हा आरोग्यसेवेतील महत्त्वाचा दुवा असून त्यांनी औषधनिर्माणशास्त्रातील संशोधन कार्यावर भर द्यावा व औद्योगिक क्षेत्राच्या गरजेप्रमाणे कौशल्य विकसित करावे, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे संचालन शिवानी ढोकणे हिने केले. डॉ. कुंदन पाटील यांनी आभार मानले. आयोजनाकरिता प्रा. मिलिंद भोयर, प्रा. आमीर खान, डॉ. कुंदन पाटील, प्रा. जयश्री हाडके आदींनी सहकार्य केले.



**वर्धा : शहनाज ताजी यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करताना डॉ. गंजीवाले.**

सकाळ
वर्धा, शुक्रवार
२७ ऑक्टोबर २०१७

# फार्मसी महाविद्यालयात पालक सभा

सकाळ वृत्तसेवा

वर्धा, ता. २६ : बोरगाव (मेघे) येथील औषधी निर्माणशास्त्र शिक्षण व संशोधन संस्था, फार्मसी महाविद्यालयात पालक सभेचे आयोजन करण्यात आले आहे. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र गंजीवाले होते. तर प्रमुख अतिथी म्हणून रवींद्र बाळापुरे, मनोज चांडक, डॉ. एन. सी. मानेकर, प्रा. एस. डी. गांधी आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविक प्रा. जी. एस. तेलतुंमडे यांनी केले. त्यांनी पालक सभेच्या आयोजनामागील भूमिका विशद केली. पालक प्रतिनिधी रवींद्र बाळापुरे व मनोज चांडक यांनी आपले मनोगत व्यक्त करून महाविद्यालयाने



वर्धा : दीपप्रज्वलन करताना मान्यवर.

विद्यार्थ्यांना पुरविलेल्या सुविधांबद्दल समाधान व्यक्त केले. उपस्थित पालकांमधून अर्चना भडांगे, विनोद घुसळीकर, विजया ठाकरे, संगीता बुटले, लीलाधर बिजवे यांनी विद्यार्थी हितार्थ महत्त्वाच्या सूचना दिल्या. प्राचार्य डॉ. राजेंद्र गंजीवाले यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून महाविद्यालयाने केलेल्या शैक्षणिक व संशोधन कार्यावर प्रकाश टाकला. तसेच विद्यार्थ्यांना कौशल्य विकासासाठी महाविद्यालय कटिबद्ध आहे, असेही ते म्हणाले. संचालन जी. एस. तेलतुमडे यांनी केले.